जंगलात बेंजामिन



एलेअनोर

जंगलात बेंजामिन

एलेअनोर

मराठी : अश्विनी बर्वे





हे एक शहर आहे – खूप व्यग्र शहर
इथे खूप घरं आहेत, खूप दुकानं आहेत.
इथे खूप ट्रक आहे आणि खूप कार आहेत,
इथे लोक कामात व्यग्र आहेत.
इथे मुलं खेळात मग्न आहेत.
पण खूप काळापूर्वी.



पण काही वर्षापूर्वी इथं कोणतंही
शहर नव्हतं, घर नव्हतं, की
कोणी लोक नव्हते.

फक्त जंगलच जंगल होते,
हिरवे भरगच्च आणि दाट
जंगल होते.

खूप काळापूर्वी एक कुटुंब त्या जंगलात आले. ते सगळे एका मोठ्या घोडागाडीत आले..



ते सगळे या जंगलात राहण्यासाठी आले होते, आई आणि वडील





जॉन काका आणि एक छोटा मुलगा,



दोन घोड़े,

एक गाय,

एक डुक्कर,



आणि बेंजामिन.



पण बेंजामिनला खेळण्यासाठी वेळच मिळत नसे. करण्यासाठी खूप काम होते. वडिलांनी आणि जॉन काकाने झाडं कापली आणि बेंजामिनने मदत केली.

बेंजामिनने चहुकडे बघितलं,” इथं या जंगलात चांगलं वाटत आहे,” तो म्हणाला. “मी शिकारी किंवा इंडियन होवून खेळू शकतो.”






त्यांनी घर बांधले, लाकडाचे
छोटेसे घर.
बेंजामिनने मदत केली.

मग त्यांनी धान्य पेरले.
बेंजामिनने मदत केली.



रोज त्यांना गायीचं दूध काढावं लागत असे, आणि बेंजामिन मदत करत असे.





कधी कधी वडील आणि जॉन काका शिका करण्यास जात होते. पण त्यावेळी बेंजामिन आईला मदत करत असे. त्याला लाकडं फोडावी लागत आणि पाणी भरावं लागत असे.

एक दिवस त्याची आई म्हणाली, “बेंजामिन, तू खूप काम करतो. आज तुझ्याकडे वेळ आहे तर थोड्यावेळ खेळून ये.” बेंजामिन बाहेर पळाला. आता तो शिकारी किंवा इंडियन म्हणून खेळेल.

पण तिथं त्याच्याशी कोणी खेळायला कोणी नव्हते.
बेंजामिन जंगलात फिरू लागला.
तो अधिक दूर जावू शकला नाही.
सगळीकडे घनगर्द जंगल होते..



ते काय आहे?

झाडाच्या मागे कोणी लपलं आहे का?

हे हरणाचे पिल्लू आहे. हरणाने आपल्या मोठ्या, घाऱ्या डोळ्यांनी बेंजामिनकडे पाहिलं.






“इथं कोणीच नाही ज्यांच्याबरोबर मी खेळू शकतो.” बेंजामिन म्हणाला. “माझ्याशिवाय इथं कोनीची नाही!”

“घाबरू नको,” बेंजामिन
म्हणाला. “मला घाबरू नको.”



त्याने हरणाच्या पिल्लाला उचलले
आणि आपल्या घराकडे पळाला.





“आई, बघ!” तो म्हणाला.
“बघ जंगलात काय सापडलं! हरणाचे पिल्लू. आता माझ्याबरोबर खेळायला कोणी तर असेल.”

“ओह, बेंजामिन,” आई म्हणाली.
“तू हरणाच्या पिल्लाला आपल्याजवळ ठेवू शकत नाही.”



“पण ते तर जंगलात हरवले होते.” बेंजामिन म्हणाला. “मला ते एका झाडाच्या मागे सापडले.”



“नाही,” आई म्हणाली. “ते हरवलेलं नाही. त्याची आई त्याला झाडाच्या मागे सोडून गेली असेल. ती आपल्या बाळाला शोधत परत येईन. त्याला परत घेवून जा.”

“पण मला त्याच्याबरोबर खेळायचे आहे.” बेंजामिन म्हणाला. “तू हरणाला ठेवू शकत नाही. ते लवकरच मोठे होईन. मग तो आपलं धान्य खाऊन टाकेल. आणि आपलं सगळं धान्य आपल्याला हवं आहे, मोठ्या हिवाळ्यासाठी.”

पुढच्या दिवशी बेंजामिन परत जंगलात फिरायला गेला. “किती शांतता आहे. माझ्याशिवाय इथं कोणीच नाही.”
बेंजामिन म्हणाला. पण तिथं जंगलात कोणी होतं.




बेंजामिन हरणाच्या पिल्लाला झाडाजवळ सोडून आला.



“तू कुठून आला?” बेंजामिनने विचारलं.
“तुझ्याबरोबर खेळायला मजा येईल.”





त्याने खारुताईच्या बाळाला
उचललं. आणि घराकडे पळाला.



“आई, बघ!”मला जंगलात काय सापडलं .तो ओरडला. खारुताईचे पिल्लू” “बेंजामिन म्हणाला. आई म्हणाली, “तू त्या पिल्लाला ठेवू शकत नाही.”



“का नाही?” बेंजामिनने विचारलं. “मोठं होवून ते आपलं धान्य खाईल का?” “नाही” आई म्हणाली. “पण त्याचा फार घाण वास येईल. आता लगेच त्याला सोडून ये आणि त्याची आईचे तुझ्याकडे लक्ष नाही ना याकडे लक्ष ठेव. नाहीतर तुला सुद्धा घाण वास येईल.”

एक दिवस तो परत जंगलात फिरायला गेला.

श..श..श.. झादामधून आवाज आला.

“माझ्याशिवाय इथं तर कोणीच नाही.”

बेंजामिन म्हणाला.

“खरंच इथं असं कोणी असतं तर ते माझ्या बरोबर खेळू शकलं असतं.”



मग बेंजामिनने खारुताईचे पिल्लू लगेच जंगलात सोडून दिले.





ते झाडावरून काय खाली येत आहे? अस्वलाचे पिल्लू. “ओह,” बेंजामिन म्हणाला. “ए अस्वलाच्या मोठ्या, खोडकर मुला”

त्याने अस्वलाच्या पिल्लाला उचलले आणि घरी पळत आला..



“आई, बघ!” तो ओरडला. “बघ मला जंगलात काय सापडलं” “आता काय आणलं” आईने विचारलं. “अस्वलाचे पिल्लू,” बेंजामिन म्हणाला. “हा आपलं अन्न खाणार नाही ना? आणि याला घाण वास येणार नाही ना? मी याला सांभाळू?”



“तिकडे बघ!” आई म्हणाली. “तुला दिसत नाही का? अस्वलाची आई सरळ आपल्याकडे येत आहे. तिला आपलं बाळ हवं आहे.”

आईने बेंजामिनला घरात ओढले आणि अस्वलाच्या पिल्लाला बाहेर ढकलले. आणि ती बंदुक घेण्यासाठी पळाली. “काय करते? तू काय करते आहेस?” बेंजामिनने विचारलं.





“बेंजामिन,” आई म्हणाली, “आता तू घरी एकही प्राणी आणणार नाहीस. कळलं तुला?”
“हो, आई” बेंजामिन उदास होवून म्हणाला, “आलं लक्षात.”

“तू काय करणार आहेस?” बेंजामिनने विचारलं.
“त्याला गोळी मारशील?”
“गरज पडली तर मारेन,” आई म्हणाली. पण अस्वलाने घराच्या आत येण्याचा प्रयत्न सुद्धा केला नाही.त्याने आपलं बाळ घेतलं आणि जंगलाकडे निघून गेलं..



दुसऱ्या दिवशी बेंजामिन परत जंगलात गेला. तो एका झाडाच्या खाली बसला होता. श..श..श.. झाडांतून वारं वहात होतं. “इथं माझ्या शिवाय हरिण, खारुताई आणि अस्वला शिवाय कोणी नाही.” बेंजामिन दुःखी होवून म्हणाला.





अचानक बेंजामिन कडे पळत कोणीतरी आलं. ते एक कुत्रं होतं. छोटं सफेद कुत्रं होतं!

बेंजामिनने कुत्र्याला उचलून घेतलं आणि पळत आपल्या घरी आला.





“आई!” तो ओरडला.
“बघ जंगलात मला काय सापडलं
“बेंजामिन!” आई म्हणाली
“मी तुला काय सांगितलं?” “पण आई
हे तर कुत्रं आहे. बेंजामिन म्हणाला.
“ये बघ.”

आई धावत बाहेर आली.
“कुत्रा!” ती म्हणाली.
“जंगलात तुला कुत्रं कुठे
सापडलं?”

वडील आणि जॉन काका सुद्धा त्याला बघायला बाहेर धावले. "मला हे जंगलात सापडलं" बेंजामिन म्हणाला. "कृपया मला हे पाळू द्या."





"बेंजामिन," त्याचे वडील म्हणाले, "हा कुत्रा कोणाबरोबर राहत असणार. कदाचित एखाद्या शिकाऱ्या सोबत. आपल्याला त्यांना शोधून काढायला हवं."

"जर आपण त्या शिकाऱ्याला शोधू शकलो नाही तर?" बेंजामिनने विचारलं.


"मग तू हा कुत्रा ठेवू शकतो." वडील म्हणाले.



तेवढ्यात कोणी तरी हक मारली, “इकडे ये सॅम, इकडे ये सॅम! तू कुठे आहेस?” कुत्र्याने मान वर करून बघितलं. “तोच शिकारी असेल.” बेंजामिन निराशेने म्हणाला. “तो कुत्रा घ्यायला आला असेल.”

“चल बेंजामिन,” जॉन काका म्हणाले. “मला ती जागा दाखव जिथं तुला हा कुत्रा सापडला.” बेंजामिन आणि जॉन काका जंगलात गेले. त्यांनी चारी बाजूला बघितलं. पण कोणीच दिसलं नाही.





मग मुलाने बेंजामिन आणि जॉन काकांकडे बघितलं. “तुम्ही माझ्या कुत्र्याला शोधून काढलं का?” त्याने विचारलं. “हो,”
बेंजामिन म्हणाला. “ते जंगलात चुकलं होतं.”



पण तो कोणी शिकारी नव्हता. तर तो एक लहान मुलगा होता. कुत्रा त्या मुलाकडे धावत गेला आणि उडी मारून त्याच्या अंगावर चढला. मुलाने कुत्र्याला उचलून घेतले. “ओह, सॅम!” मुलगा म्हणाला. “तू कुठे गेला होतास, सॅम!”



“तू कुठे राहतो?” जॉन काकांनी विचारलं. “तू इथं काय करतो आहेस? तुझे आई-वडील कुठे आहेत?”



“आम्ही थोड्या वेळापूर्वीच जंगलात आलो आहोत,” मुलगा म्हणाला. “आम्ही एका घोडागाडीत आलो. आता आम्ही इथेच राहणार आहोत. तुम्ही कुठे राहतात?”

“माझ्या बरोबर चल,” बेंजामिन म्हणाला. दोघं पळत बेंजामिनच्या घरी आले.

“आई,” बेंजामिन ओरडला. “बघ मला जंगलात काय सापडलं!”



“ओह, हा मुलगा पण!” आई म्हणाली. “आता काय शोधून आणलं”



मग आईनं मुळाकडे बघितलं, “तू कुठून आलास?” तिने विचारलं.

“चल,” आई म्हणाली. “आपण तुझ्या आई-वडिलांकडे जावू या. त्यांना मदतीची गरज असेल.”





“तो इथं राहयला आला आहे,” बेंजामिनने सांगितलं. “तो आपल्या आईवडिलां बरोबर इथं घोडागाडीत इथं आला. आपल्या सारखा!”



“तुला या जंगलात चांगलं वाटतं का?” मुलाने विचारलं. “ओह, हो,” बेंजामिन म्हणाला. “इथं हरिण, अस्वल आणि खारुताई सुद्धा आहे.”



“झाडं कापायला आपण त्यांना मदत करू,” वडील म्हणाले आणि “धान्य पेरायला,” जॉन काका म्हणाले. “आम्हांला रस्ता दाखव.” वडील त्या मुलाला म्हणाले.
आणि मग सगळे गेले.



मुलाने बेंजामिन कडे बघितलं. आणि विचारलं,
“तू शिकारी किंवा इंडियनचा खेळ खेळशील का?
“हो हो,” तो म्हणाला. “मला तो खेळ खेळायचा आहे.”

समाप्त